"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेकरीता प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- मबावि-२०२४/प्र.क्र.१९०/का-२
नविन प्रशासन भवन,तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ जूलै, २०२४.

परिपत्रक

"मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण" या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करणे व अर्ज अंतिम करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी मार्गदर्शक सुचना व करावयाच्या कार्यवाहीबाबतचा संक्षिप्त तक्ता या शासन परिपत्रकासोबत निर्गमित करण्यात येत आहे.

२. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी सदर मार्गदर्शक सुचना संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही होईल याबाबतची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आनंद भोंडवे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२ आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
३. जिल्हाधिकारी (सर्व),
४. सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व सह आयुक्त/उप आयुक्त / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
६. सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत),
७. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय पुणे मार्फत),
८. संबंधित छाननी यंत्रणा (जिल्हाधिकारी यांच्या मार्फत)
९. निवड नस्ती, कार्यासन-२

# अ) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेचे अर्ज छाननी / अंतिम करण्याची कार्यपध्दती

१) "नारी शक्ती दुत" या ॲपद्वारे "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेचा लाभ मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेल्या अर्जाची पाहणी, छाननी, पात्र- अपात्रतेबाबत निर्णय इत्यादी कार्यवाही करण्याकरीता https://portal.yojanadoot.com हे पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

२) सदर पोर्टलवर कार्यवाही करण्याकरीता जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) व जिल्हा महिला बाल विकास अधिकारी तसेच तालुकास्तर व त्याअंतर्गत महानगरपालिकांचे वॉर्डस्तर इत्यादीकरीता User ID व Password उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदर Password Reset करुन घ्यावेत. Password अन्य कोणासही Share न करण्याबाबत सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) व जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांना या पोर्टल वर Viewing Rights देण्यात आले आहेत. तर जिल्हाधिकारी यांना पोर्टलमध्ये Viewing व Approval चे अधिकार राहतील.

४) तालुका / वॉर्ड स्तराकरीता एकापेक्षा अधिक User Id व Password जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या पोर्टलवर वार्डनिहाय अर्ज पाहण्याची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे तालुकास्तरीय User Id पैकी आवश्यकतेनुसार काही User Id त्याअंतर्गत येणाऱ्या महानगरपालिकांच्या वार्डस्तरीय जबाबदार अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावेत जेणेकरुन ते तालुक्याच्या यादीमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील अर्जाची छाननी करु शकतील. महानगरपालिका क्षेत्रांमधील तालुक्यांच्या बाबतीत तालुक्यांच्या User Id ना वार्ड User Id गृहीत धरुन काम करावे. त्याकरीता तालुक्यांनी महानगरपालिकेच्या अधिका-यांशी समन्वय ठेवून काम करावे.

५) जिल्हाधिकारी यांनी त्यांना तालुका / वार्ड करीता पाठविण्यात आलेले User Id संबंधित तालुका / वार्ड स्तरावरील अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. ही कार्यवाही करण्याकरीता निवासी उपजिल्हाधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. त्यानुसार नोडल अधिकारी यांनी तालुका/ वार्ड स्तराकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेले User Id यांची नोंद ठेवावी. तसेच कोणत्या अधिकाऱ्यास कोणता User Id दिला याबाबतची देखील नोंद ठेवावी.

६) निवासी उपजिल्हाधिकारी यांनी तालुका / वार्ड स्तरीय अधिकाऱ्यांना User Id व Password उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यांना Password Reset करण्याबाबत सुचित करुन Password Reset झाल्याबाबतची खातरजमा करावी.

७) तालुका / वार्ड स्तरीय अधिकाऱ्यांना User Id व Password प्राप्त झाल्यांनतर त्यांनी वरील सुचनांनुसार Password Reset करुन घ्यावा. तद्नंतर प्रशासकीय सोयीकरीता गठीत शासकीय सदस्यांच्या तालुका / वार्ड समिती मार्फत अर्जाची छाननी प्रक्रिया पोर्टलवर सुरु करावी. आवश्यकता असल्यास अर्जाची यादी Excel Sheet मध्ये डाऊनलोड करुन घेण्यात यावी. याबाबतची सुविधा त्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे. Excel Sheet डाऊनलोड केल्यानंतर गाव / पिन कोड इत्यादी निकषांच्या आधारे यादीचे विलगीकरण करता येईल.

८) "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेकरीता आवश्यक असणाऱ्या माहितीनुसार तालुका / वार्ड स्तरीय अधिकाऱ्यांनी अर्जाची छाननी करावी व तात्पुरते पात्र / अपात्र याप्रमाणे शेरे नोंदवावे. अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास त्या त्रुटींची दुरुस्तीकरीता ॲपमध्ये एकवेळा दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. जर प्राथमिक स्वरुपाची त्रुटी असल्यास संबंधित लाभार्थ्यांशी संपर्क साधून Edit Option वर जाऊन त्रुटी पुर्तता करुन घ्यावी. अन्यथा कोणत्या स्वरुपाची त्रुटी आहे हे चिन्हांकित केल्यास सदर अर्ज तात्पुरता अपात्र होऊन संबंधितास त्रुटी पुर्तता करण्याबाबत मोबाईलवर मेसेज जाईल. त्यानुसार अर्जदाराने ज्या Login मधून अर्ज भरला होता त्याच Login मधून त्यास त्रुटी पुर्तता करता येईल.

९) वरीलप्रमाणे तालुका स्तरीय / वार्डस्तरीय अधिकाऱ्यांनी छाननी अंती तात्पुरते पात्र केलेले अर्ज जिल्हाधिकारी यांना त्यांच्या Login वर पाहण्यास उपलब्ध होतील. तात्पुरते अपात्र केलेले अर्ज त्रुटी पुर्ततेकरीता संबंधितांना उपलब्ध होतील.

१०) जिल्हाधिकारी यांना त्या-त्या तालुक्याचे तात्पुरते पात्र केलेले अर्ज पाहण्यास उपलब्ध झाल्यानंतर त्यांना त्याबाबतची यादी Excel मध्ये डाऊनलोड करुन विधानसभा क्षेत्रनिहाय वर्गीकरण करता येईल.

११) जिल्हाधिकारी यांनी तालुका / वार्ड पातळीवरुन तात्पुरते पात्र केलेल्या अर्जाची माहिती विधानसभा क्षेत्र समितीच्या निदर्शनास आणावी. आवश्यकतेनुसार त्यांना पोर्टलवर त्या बाबतची माहिती दाखवावी. त्यानंतर त्यांनी लाभार्थ्यांच्या पात्रतेबाबत अंतिम निर्णय घेतल्यानंतर त्या प्रमाणे त्यांच्याकडून प्रमाणपत्र घ्यावे. त्या प्रमाणपत्रावर अध्यक्ष व इतर दोन अशासकीय सदस्य तसेच सदस्य सचिव यांची स्वाक्षरी असावी.

१२) विधानसभा क्षेत्रनिहाय समितीने सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अध्यक्षांच्या मान्यतेने जिल्हाधिकारी यांच्या यंत्रणांनी पोर्टलमध्ये अंतिम केलेल्या लाभार्थ्यांची पात्र म्हणून नोंद करावी. त्याप्रमाणे लाभार्थी अंतिमत: पात्र झाल्याची माहिती आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे व शासन स्तरावरील लॉगिन मध्ये पाहण्यास उपलब्ध होईल.

१३) वरीलप्रमाणे कार्यवाही सातत्यपुर्वक सुरु ठेवावी जेणेकरुन अंतिम पात्र झालेल्या लाभार्थ्यांना लाभ अदा करणे व नव्याने दाखल झालेल्या अर्जाची छाननी करणे एकाचवेळी सुरु राहील. तसेच ज्या

अर्जांच्या बाबतीत त्रुटी आहे त्यांनी त्रुटी पुर्तता केल्यानंतर वरील कार्यपध्दतीनुसार त्यांच्या अर्जाबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा.

१४) संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्या सहमतीने त्यांचे जिल्हयामध्ये अंतिमत: पात्र केलेल्या लाभार्थ्यांबाबतची माहिती नमूद करुन आवश्यक निधी इत्यादी बाबत प्रस्ताव आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडे सादर करावा.

१५) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना या पोर्टलकरीता Login उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांना जिल्हाधिकारी यांचेकडून पोर्टलवर अंतिम पात्र म्हणून नोंद केलेल्या लाभार्थ्यांची माहिती पाहता येईल. त्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी राज्यातील अंतिम पात्र लाभार्थ्यांची माहिती नमूद करुन त्याकरीता किती निधी आवश्यक आहे याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

१६) वरीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांना लाभ अदा करण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

आपला,

(आनंद भोंडवे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

# "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेचे अर्ज छाननी/ अंतिम करण्याची कार्यपद्धती

जिल्हाधिकारी , मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प.) व जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांच्याकरिता User ID व Password उपलब्ध असतील. त्याद्वारे https://portal.yojanadoot.com) या पोर्टल वर लॉग इन करून त्वरित पासवर्ड बदलावेत. जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात आलेले तालुका / वॉर्ड करिता लॉग इन संबंधितांना उपलब्ध करून द्यावेत. त्याबाबत RDC यांनी रेकॉर्ड ठेवावे.

↓

जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त शासकीय सदस्यांची तालुका /वार्ड समिती यांचेमार्फत अर्जांची छाननी करावी. त्यामध्ये आवश्यकतेनुसार विविध विभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश असावा.

↓

तालुका / वॉर्ड समितीने अर्जांची छाननी करताना ग्रामस्तरीय समितीने केलेल्या चावडी वाचनानुसार अथवा नागरी क्षेत्रात मदत कक्षाने यादी केली असल्यास ती देखील विचारात घ्यावी. त्यामुळे छाननीची प्रक्रिया सुलभ होईल. छाननी अंती तात्पुरते पात्र लाभार्थी निश्चित करावेत व त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी यांना द्यावी. त्यानुसार तात्पुरते पात्र लार्भार्थ्यांची यादी जिल्हाधिकारी यांना पोर्टलवर उपलब्ध होईल. तात्पुरते अपात्र झालेल्या लाभार्थ्यांना त्रुटी पुर्तता करण्याबाबत मोबाइलवर मेसेज जाईल.

↓

जिल्हाधिकारी यांना पोर्टलमध्ये त्यांच्या जिल्ह्यातील छाननी यंत्रणांनी छाननी अंती केलेली तात्पुरते पात्र लाभार्थ्यांची यादी पाहता येईल. तात्पुरते पात्र लाभार्थ्यांची यादी विधानसभा क्षेत्रनिहाय समितीला त्यांचे क्षेत्रानुसार पाहण्यास उपलब्ध करावी. (विधानसभा क्षेत्रामध्ये येणारे गाव/वार्ड याची माहिती जिल्हाधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे.)

↓

विधानसभा क्षेत्र निहाय समिती लाभार्थ्यांच्या पात्रतेबाबत अंतिम निर्णय घेईल.

↓

लाभार्थ्यांना अंतिम पात्र केल्याबाबत विधासभा क्षेत्रनिहाय समितीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी अध्यक्षांच्या मान्यतेने त्यांचे यंत्रणेद्वारे अंतिम पात्र केलेल्या लाभार्थ्यांची Portal मध्ये नोंद घ्यावी व त्याप्रमाणे निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी आयुक्त, महिला व बाल विकास,पुणे यांच्याकडे सादर करावा.

↓

जिल्हाधिकारी यांनी पोर्टलमध्ये नोंद घेतलेल्या अंतिम पात्र लाभार्थ्यांची यादी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी पोर्टलमध्ये पहावी व त्याप्रमाणे निधी मागणीचा एकत्रित प्रस्ताव आयुक्त, महिला व बाल विकास शासनास सादर करतील.

↓

पात्र लाभार्थ्यांना लाभ अदा करण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

** वरील प्रमाणे कार्यवाही सातत्यपुर्वक सुरु ठेवावी जेणेकरुन अंतिम पात्र झालेल्या लाभार्थ्यांना लाभ अदा करणे व नव्याने दाखल होणा-या अर्जांची छाननी करण्याची कार्यवाही एकाच वेळी सुरु राहील. तसेच ज्या अर्जांच्या बाबतीत त्रुटी आहेत, त्यांनी त्रुटी पुर्तता केल्यानंतर वरील कार्यपध्दतीनुसार त्यांच्या अर्जाबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा.

*** मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त व जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांना या पोर्टलवर Viewing Rights असणार आहेत. जिल्हाधिकारी यांना या पोर्टलमध्ये Viewing सह Approval चे अधिकार असतील.

**** जिल्हाधिकारी/तालुकास्तर यांना त्यांचे लॉगीनमधून लाभार्थ्यांची यादी Excel मध्ये डाउनलोड करण्याची सूविधा असेल.